## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

शुक्रवार दिनांक १२ जुलै १९९६ रोजी झालेल्या मंडळाच्या ३८ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची ३८ वी बैठक शुक्रवार दिनांक १२ जुलै १९९६ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण | सभापती. |
| २] | श्री. अशोक लाल | मुख्य अधिकारी. |
| ३] | श्री. अरविंद रेळे | सदस्य. |
| ४] | श्री. विनोद घोषकर. | ,, |
| ५] | श्री. चंद्रकांत विश्वासराव. | ,, |
| ६] | श्री. अमोद उसपकर. | ,, |
| ७] | श्री. भालचंद्र ठाकूर. | ,, |
| ८] | श्री. दगडू सकपाळ | ,, |
| ९] | श्री. देवदास साटम | ,, |
| १०] | श्री. प्रकाश संपत भूवड | ,, |
| ११] | श्री. दिलीप गोडांबे | ,, |
| १२] | श्री. गणेश तिकोने | ,, |
| १३] | डॉ. विनोद मेहता | ,, |
| १४] | श्री. अभय सावरकर | ,, |
| १५] | श्री. अनंत पालकर | ,, |
| १६] | श्री. दाजी मोढक | ,, |
| १७] | प्रमुख अभियंता, म. न. पा. ह्यांचे प्रतिनिधी | निमंत्रक. |

बैठकीच्या सुरुवातीस मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे व अधिकारी वर्गाचे स्वागत करून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस यांचे गेल्या महिन्यात दि. १६ जून ९६ रोजी दिर्घ आजारानंतर निधन झाल्याबद्दल श्रध्दांजली वहाण्याचा शोक प्रस्ताव मांडण्याबाबत विनन्ती केली.

...२/-

तद्नुसार मा. सदस्य श्री. गणेश तिकोने यांनी कै. बाळासाहेब देवरस यांना श्रध्दांजली वहाताना सांगितले की, एक चांगले सेवाभावी नेतृत्व आपल्या देशातून हरपले आहे. त्यामुळे आपल्या देशाचे नुकसान झालेले आहे. सर्व वर्तमानपत्रांचे अग्रलेख कै. बाळासाहेब देवरस यांच्या निधनानंतर झालेली जी तूट आहे, जी हानी झाली आहे तिचे समर्थन करणारे होते. "सामना" या वर्तमानपत्रानेसुध्दा हिंदुत्वाचा देवरस हरपला असे टायटल दिले, तर "लोकसत्ता" या वर्तमानपत्रात पराक्रम पर्वाची समाप्ती अशाप्रकारचे अग्रलेख आहेत. गेली ६० वर्षे संपूर्ण देशाची सेवा करणारे चांगले नेतृत्व हरपले असे सांगून आजच्या बैठकीमध्ये कै. बाळासाहेब देवरस यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्याचा शोक प्रस्ताव मांडला. त्याप्रमाणे सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांनी व अधिका-यांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून कै. बाळासाहेब देवरस यांना श्रध्दांजली वाहिली.

शोक ठराव क्रमांक : ३८/२८९

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक कै. बाळासाहेब देवरस यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करुन सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून, त्यांना श्रध्दांजली वाहिली.

---

सभेच्या सुरुवातीस मा. सभापती यांनी, राज्य सरकारच्या वतीने संबंधित अधिकारी वारंवार विनन्ती करुनही मंडळाच्या नियमीत बैठकीस हजर रहात नसल्याबाबत सन्मा. सदस्यांनी तक्रार केली होती. त्यानुसार शासनाला याबाबत पत्र लिहावयाचे ठरले होते. त्याप्रमाणे कार्यवाही झाली का? अशी विचारणा केली. आजच्या बैठकीस शासनाचे उप सचिव तसेच विशेष भूसंपादन अधिकारी उपस्थित नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यावर खुलासा करताना मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, नव्याने नियुक्त झालेले उप सचिव श्री. गोखले हे आज विधान सभेत ब्रिफिंग असल्यामुळे येऊ शकले नाहीत. यावर मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, गैरहजर रहाणा-या संबंधित अधिका-यांना पत्र लिहून कळवावे की, सन्मा. सदस्यांनी त्यांच्या विभागातील येणा-या तक्रारींबाबत योग्य तो मार्ग काढण्यासाठी संबंधित शासनाचे अधिकारी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन करून नियमित बैठकीस सुचना करण्यात आली.

...3/-

बाब क्रमांक :- ३८.१

विषय :- मंडळाची दिनांक ५.६.९६ रोजी झालेल्या ३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करण्याबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

दिनांक ५.६.९६ रोजी झालेल्या मंडळाच्या ३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करण्यासाठी पृ.क्रं. १ ते १०३ वर सादर करण्यांत आला आहे.

यावर चर्चा करतांना मा.सभापती यांनी उपरोक्त कार्यवृत्तांताबाबत कोणाला काही सुचवावयाचे आहे काय अशी विचारणा केली. यावर मा. सदस्य श्री.अरविंद रेळे यांनी डॉ.आंबेडकर सदन, करी रोड येथे बौध्दजन पंचायत समितीने शववाहिनीची शेड बांधण्याकरिता परवानगी मागितली असून, त्याबाबत मागील सतत ३-४ महिन्यांत पत्रे लिहून, पाठपुरावा करुनही तशी परवानगी अद्याप देण्यांत न आल्याबाबत संताप व्यक्त केला. याबाबत खुलासा करताना मुख्य अधिकारी/दुबपु यांनी स्पष्ट केले की, ते सन्मा. सदस्यांच्या मताशी सहमत आहेत, परंतु सदर बाब ही प्रादेशिक मंडळाच्या अखत्यारित येत नसल्यामुळे ती प्राधिकरणाच्या बैठकीपुढे आणावी लागेल. तरी आपली विनन्ती प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यांत येईल. यावर मा. सदस्य श्री.सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, हा प्रश्न मंडळाच्या अखत्यारित येत नसेल तर सदस्यांचे जे काही म्हणणे आहे ते प्राधिकरणापुढे ठेवण्यांत यावे. मा. सदस्य श्री.रेळे यांनी विनन्ती मंजूर करावी किंवा नाकारावी, परंतु त्यांनी पाठविलेल्या पत्रांना पोच तरी देण्यांत यावी असे सांगितले. यावर प्रदिर्घ चर्चेअंती मा.सभापती यांनी श्री.अरविंद रेळे, ~~मा.सभापती यांनी श्री.अरविंद रेळे, मा.सदस्य~~ यांनी उपस्थित केलेल्या डॉ.आंबेडकर सदन, करीरोड येथे बौध्दजन पंचायत समितीने शववाहिनीची शेड बांधण्याकरिता परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे ठेवण्याचे आश्वासन देवून तशा संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री.विश्वासराव यांनी बैठकीचा अजेंडा मंडळाच्या बैठकीपूर्वी निदान पाच दिवस आधी मिळावा अशी विनन्ती केली. अजेंडा बैठकीच्या आधी १-२ दिवस दिला जातो. त्यामुळे वाचावयास वेळ मिळत नाही असे मत मांडले. यावर मा.सभापती यांनी बैठकीचा अजेंडा बैठकीपूर्वी पाच दिवस आधी उपलब्ध करुन देण्यांत येईल असे आश्वासन देवून मा.सदस्य

...४/-

श्री• अरविंद रेळे यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत प्राधिकरणास पुढील मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्याच्या अटीस अधिन राहून दिनांक ५.६.८६ रोजी झालेल्या ३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त सर्वानुमते स्थायी करण्यांत आला.

---

बाब क्रमांक :- ३८/२.

अनुपालन अहवाल. [दक्षिण विभाग]

विषय :- इ. क्र. १२३, अर्देशिर दादी स्ट्रीट हया इमारतीच्या चौथ्या टप्प्याच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

मागील बैठकीमध्ये सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबतचा अनुपालन अहवाल पृ. क्र. १०५ ते १०७ वर सादर करण्यांत आला आहे. सदर विषयाबाबत सभागृहात प्रदीर्घ चर्चा होऊन सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

बाब क्रमांक :- ३८/३.

विषय :- प्राधिकरण अधिनियम १९७६ चे कलम १०१[ब] अंतर्गत सहकारी संस्थांच्या प्रस्तावांना मंजूरी मिळणेबाबत.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

१] इ. क्र. १५ कॉन्ट्रॅक्टर बिल्डींग, विजू कोटक मार्ग, कारवार स्ट्रिट, मुंबई-३८.

२] इ. क्र. २०९[एफ] मारवाडी चाळ, ताडदेव मार्ग, मुंबई- ७.

३] इ. क्र. ५६/५८, गोपाळ मेन्शन, गोखले रोड, [दक्षिण], मुंबई-२८.

४] इ. क्र. २६, विठ्ठल मंदीर, सरदार वल्लभभाई पटेल रोड, खेतवाडी, मुं. ४

५] इ. क्र. १४९, अमृत लाभ, हिंदू कॉलनी, दादर, मुंबई - १४.

६] इ. क्र. १४७ भरुचा भवन, अलीभाई प्रेमजी मार्ग, ग्रॅन्ट रोड, मुंबई-७.

७] इ. क्र. ३०७ केरवाला बिल्डींग, जे. डी. मार्ग, नाना चौक, ताडदेव, मुं. ७

८] इ. क्र. ११ जयमहल, "जी. जी. भाई लेन" लालबाग, मुंबई-१२.

उपरोक्त प्रकरणाचे आठ प्रस्ताव बृ. क्र. १०९ ते २०१ वर सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावाबाबत बोलताना मा. सभापती यांनी माहिती दिली की, नियोजीत सहकारी संस्थाच्या भाडेकरु/रहिवाश्यांना येणा-या संभाव्य अडचणीबद्दल अधिकारी वर्गानि तसेच प्रतिनिधींनी कल्पना दिली पाहिजे कारण रहिवाशांनी कलम १०३[ब] खाली आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करुन झाल्यानंतर त्यांच्या लक्षात येते की, त्यांचा प्लॉट रस्ता रुंदीकरणामध्ये जातो किंवा प्लॉटवर रिझर्वेशन येते. काही वेळा जुन्या इमारतीमध्ये वापरण्यात आलेला च. क्षे. नि. हा २.०० पेक्षा जास्त असतो, अशावेळी त्यांनी असे सुचविले की, रहिवाशांना कलम १०३[ब] खाली सोसायटी बनविण्यासाठी प्रोत्साहन देताना एखाद्या अनुभवी वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करुन ज्या जमिनीचा भुभाग आपण ताब्यात घेत आहोत त्यावर इमारत बांधू शकतो का? कारण त्यामध्ये आर्थिक गुंतवणूक असते, तसेच अशा प्रकरणामध्ये रहिवाशांना संक्रमण शिबीरात जागा देण्याची जबाबदारी मंडळ घेत नाही. म्हणून याची उपयुक्तता पहिल्यांदा वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून तपासून घ्यावयाची. मा. सभापती यांनी वानगी दाखल शिवडी येथील मोरे चाळीचे उदाहरण देऊन सांगितले की, सदर इमारत रस्तारुंदीकरणामध्ये गेल्याचे लक्षात आल्यानंतर रहिवाशांचा १०३[ब] च खाली मांडलेला त्यांचा प्रस्ताव रद्द करण्यांत यावा असे पत्र दिले आहे. म्हणून रहिवाशांना प्रोत्साहन देताना रहिवाशांवर पडत असलेली सर्व जबाबदारी, त्यांना द्यावे लागणारे टॅक्सेस व असेसमेंटचा विचार करता त्यांची स्थिती अतिशय बिकट होते, हे लक्षात घ्यावे. त्याकरीता आजच्या बैठकीत जे जे प्रस्ताव ठेवण्यांत आले आहेत त्या रहिवाशांना सन्मा. सदस्यांनी समजावून सांगितले पाहिजे की, प्रकरण सुप्रीम कोर्टात निर्णयासाठी असून कॉन्स्टीटयूशनल बेंचपुढे त्याबाबत धोरणात्मक निर्णय व्हावयाचा आहे. म्हणून सदर प्रस्ताव मंजूर करुन ताबा देण्याच्या अंतिम क्षणापर्यंत मंडळ निर्णय घेऊ शकते. व सुप्रीम कोर्टाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून ताबा देण्यांत येईल, याची रहिवाशांना जाणीव करुन द्यावी.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळापुढे प्रस्ताव ठेवताना संबंधित जागा रिझर्वेशन किंवा रस्तारुंदीकरणामध्ये जाते ही बाब मंडळाच्या अधिका-यांच्या लक्षात येत नाही का? [redacted] यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशाप्रकारचे प्रस्ताव सादर करताना महानगरपालिकेकडून...

त्याबर काही आरक्षण किंवा रस्तारुंदीकरण आहे किंवा नाही याबाबत दाखला आणावा व त्यानंतरच प्रस्ताव मंडळापुढे सादर करावा असे सूचविले. यांस सर्वानुमते सहमती दर्शविली.

आवर मा. सभापती यांनी मंडळाची नैतिक जबाबदारी म्हणून वरील बाबी भाडेकरू/रहिवाशांच्या लक्षात आणून द्याव्यात. तसेच श्री. घोडस्कर यांना सूचना दिल्या की, यापुढे रहिवाशांना सहकारी संस्था स्थापन करताना मंडळातर्फे वरील गोष्टींची जाणीव करून देण्यात यावी.

सविस्तर चर्चेअंती म्हाडा कलम १०३[ब] अंतर्गत सहकारी संस्थांच्या आठही प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ३८/२९०

प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम १०३[ब] अंतर्गत सहकारी संस्थांच्या खालील आठ प्रस्तावांना सुप्रीम कोर्टाचा अंतीम निर्णय गृहीत धरून व तशी रहिवाशांना जाणीव करून ~~देऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली~~ ~~खालील~~ देण्याच्या अटीस अधि०-२१६ ... सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[१] इ. क्र. १५, कॉन्ट्रॅक्टर बिल्डींग या नावाने ओळखल्या जाणा-या बिजू कोटक मार्ग, कारवार स्ट्रिट, मुंबई "अ" विभाग, मुंबई- ४०० ०३८ येथील भूखंड व त्यावरील इमारतींसह [नियोजित] कॉन्ट्रॅक्टर बिल्डींग सहकारी गृहनिर्माण संस्थेकरीता संपादन करण्याचा प्रस्ताव.

[२] इ. क्र. २०९ [एफ] मारवाडी चाळ, या नावाने ओळखल्या जाणा-या ताडदेव मार्ग, मुंबई-०७ येथील भूखंड व त्यावरील इमारती सह. नियोजित मारवाडी चाळ, सहकारी गृहनिर्माण संस्थेकरीता भू-संपादन करण्याचा प्रस्ताव.

[३] इ. क्र. ५६/५८ गोपाळ मेन्शन या नावाने ओळखल्या जाणा-या गोखले रोड [दक्षिण], मुंबई- ४०० ०२८ येथील भूखंड व त्यावरील इमारतीसह नियोजित सिध्दिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता भू-संपादन करण्याचा प्रस्ताव.

[४] इ. क्र. २६ विठ्ठल मंदिर या नावाने ओळखल्या जाणा-या सरदार वल्लभभाई पटेल रोड, खेतवाडी, मुंबई- ४०० ००४ येथील भूखंड व त्यावरील इमारतींसह नियोजित विठ्ठल कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

[५] इ. क्र. १४९, अमृत लाभ, हिन्दु कॉलनी, एफ/एन विभाग, दादर, मुंबई-१४ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित अमृतलाभ सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

...७/-

[६] इ. क्र. १४७, भरुचा भवन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अली भाई प्रेमजी मार्ग, ग्रँन्ट रोड, मुंबई – ४०० ००७ "डी" विभाग येथील भूखंड व त्यावरील इमारत नियोजित "हिल मेन्शन" सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

[७] इ. क्र. ३०७ केरवाला बिल्डींग, जे. डी. मार्ग, नाना चौक, डी–बिभाग, ताडदेव मुंबई–०७, येथील निबोजित केरवाला सहकारी गृहनिर्माण संस्थेचा भू-संपादनाचा प्रस्ताव.

[८] इ. क्र. १९ "जयमहल" जीजी भाई लेन लालबाग, मुंबई–१२ येथील सीनयोजित जयमहल सहकारी गृहनिर्माण संस्थेचा भूसंपादनाचा प्रस्ताव.

---

ठराव क्रमांक :- ३८/४.

विषय :- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीचे कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

उपरोक्त विषयाबाबत जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या दुरुस्ती कामाची अंदाजपत्रके व नकाशांना मंजूरीचे प्रस्ताव पृ. क्र. २०३ ते ५४३ वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आलेले आहेत.

वरील विषयाबाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री. उसपकर यांनी पृ. क्र. २३७ वर अ. क्र. १५ समोर प्रमाणित मर्यादा रु. ७५०/– च्या हिशेबाने रक्कम किती येते ते दिलेले नाही असे निदर्शनास आणून दिले, व माहिती दिली की, सदर इमारतीत फक्त ४ भाडेकरु आहेत. जर आजुबाजूला प्लॉट रिकामा असेल तर ८८[३] आपणककधी करणार? याबर खुलासा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, प्रचलित मर्यादेवरील जादा रक्कम रहिवाशी भरावयास तयार असतील तर मंडळ ८८[३] जाहिर करीत नाही. परंतु जर रहिवाशांना अधिक पैसे भरणे शक्य नसेल तर मंडळ ८८[३] जाहिर करते. त्याकरिता रहिवाशांना प्रथम पत्र पाठवावे लागेल. यावर मा. सदस्य श्री. उसपकर यांनी त्यासाठी किती काळ वाट बघायची अशी विचारणा करता मा. सभापती यांनी प्रस्ताव मंजूर केल्यानंतर १०–१५ दिवसात त्यांना पत्र पाठवावे नंतर दोन महिने वाट पहावयाची. जर अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल.

...८/-

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी विचारणा केली की, सदर इमारतीचा भूखंड छोटा असल्यामुळे शेजारील इमारतीची परिस्थिती खराब असेल तर सामाईक पुनर्बांधणी योजना राबविता येईल. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर इमारतीचे रहिवाशी दुरुस्ती करण्यासाठी आग्रह धरत आहेत, अशावेळी संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविण्याच्या दृष्टीने अडचणी निर्माण होतात, काही वेळा भूखंडाचा काही भाग कलम-९१ अंतर्गत संपादित करावा लागतो, त्यामुळे रहिवाशी संक्रमण शिबीरात पडून रहातात व सामाईक योजना राबविली जात नाही.

मा. सदस्य श्री. देवदास लाटम व इतर सन्मा. सदस्यांनी दक्षिण परिमंडळातील सुधारीत क्षेत्रफळाबाबत पृ. क्र. २७७, २९३, २९८ व ४१७ वर सादर केलेल्या प्रस्तावातील स्पष्टीकरणाबाबत तीव्र नापसंती दर्शवून सांगितले की, दोषी वास्तुशास्त्रज्ञावर योग्य ती कार्यवाही न केल्यामुळे ते त्यांच्या मनास वाटेल तसे करतात, तरी याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी, असे मत प्रदर्शित केले. यावर मा. सभापती यांनी सांगितले की, वास्तुशास्त्रज्ञ करीत असलेल्या चुकांबाबत त्यांच्या कौन्सिलकडे कळविण्यांत यावे. इमारतीचे रहिवाशी सांगतात की, वास्तुशास्त्रज्ञ इमारतीस भेट द्यावयास येतच नाहीत. मंडळात काहीही केले तरी चालते, अशी वास्तु-शास्त्रज्ञांची भावना आहे ती संपुष्टात आणली पाहिजे.

यावर निवासी कार्यकारी अभियन्ता श्री. गद्रे यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, साईटवर जेव्हा भूखंडाची मोजणी करण्या-करिता मापे घेतली जातात, तेव्हा काही काही कॉर्नर असे असतात की, तेथे प्रत्यक्ष माणसांना पोहोचणे कठीण असते. लेन लहान असतात. तेथे टेपसुध्दा लावता येत नाही. उंची मोजावयाची झाली तर वरच्या बाजूस मापून पोहोचू शकत नाही. मोजमाप घेण्याच्यावेळी मंडळाचे अभियंतेसुध्दा त्यांच्याबरोबर उपस्थित असतात. अभियंते व वास्तुशास्त्रज्ञ अशावेळी चर्चा करुन मापे ठरवितात. मापे जास्तीतजास्त बरोबर कसे येईल याचा ते प्रयत्न करतात आणि त्यानंतरही जर फरक रहात असेल तर मंडळाच्या निदर्शनास आणून देणे हे त्यांचे कर्तव्य असते. त्याप्रमाणे ५ टक्के अधिक किंवा कमी क्षेत्रफळातील फरक यापूर्वी मंजूर करण्यांत येत असे. पृ. क्र. ४१७ वर बोलताना मा. सदस्य श्री. उसपकर यांनी अशी विचारणा केली की, मंडळ सदर मालमत्तेवर अटॅचमेन्ट आणू शकत नाही का? यावर खुलासा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, म्हाड कायद्यामध्ये अटॅचमेंट किंवा मालमत्ता

ताब्यात घेण्यासाठी तरतुद नाही असे सांगून तशी तरतुद करण्यास मंडळाने मागेच शासनाकडे शिफारस केलेली आहे. सुखथनकर समिती या सगळ्या गोष्टींचा विचार करणार आहे. तरीही सदर इमारतीची मंडळाचे सदस्यांमार्फत पहाणी करण्यांत येऊन जर सदस्यांना वाटले की, अंदाजपत्रक जास्त होत आहे तरी इमारतीची दुरुस्ती थांबवावयाची नाही. परंतु अंदाजपत्रकामध्ये बदल करून घेण्यात येईल, यास सर्वांनी सहमती दर्शविली.

पृ. क्र. ३५३ वरील प्रस्तावाबाबत बोलताना मा. सभापती यांनी असे मत मांडले की, अशी अंदाजपत्रके तयार करण्यापूर्वी पहाणी करणे आवश्यक आहे. भाडेकरूंनी त्यांच्या हिश्याची जादा रक्कम ९ लाख रुपये खर्च करून इमारतीचे आयुष्य किती वर्षांनी वाढेल अशी विचारणा करता संबंधित अधिकारी यांनी १०–१५ वर्षांनी वाढेल असे सांगितले. यावर मा. सभापती यांनी इमारत दुरुस्त करावयाची झाल्यास अंदाजपत्रके बारेमाप तर केलेले नाही ना याची संबंधित अधिकाऱ्यांनी पहाणी करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी सदर इमारतीचे लोक जर पैसे भरावयास तयार असतील व इमारत धोकादायक इमारतींच्या यादीतील असेल तर दुरुस्तीचे काम हाती घ्यावयास हरकत नाही असे मत मांडले. तसेच जरूर भासल्यास सदर इमारतीस मा. सदस्यांनी भेट द्यावी. परंतु अंदाजपत्रक मंजुर केले नाही म्हणून काही अपघात झाला तर त्याची जबाबदारी मंडळाकडे नको.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी पृ. क्र. ३५५ वरील प्रस्तावावर चर्चा करताना असे निदर्शनास आणले की, सदर सुधारीत अंदाजपत्रक मुळ अंदाजपत्रकापेक्षा १०% वर गेलेले असून निकाअ/दुवप यांनी त्यांची तपासणी केली का, तसेच पुष्कळ वेळा सुधारीत अंदाजपत्रकाच्या प्रस्तावामध्ये काम सुरू होणार आहे असे लिहिले जाते. परंतु प्रत्यक्षात मुळ टप्प्याचे काम चालू असते. याबर नि. का. अ. /दुवप यांनी जरुरी तपासणी झाली किंवा नाही हे खात्री करून सांगतो असे आश्वासन दिले.

मा. सभापती यांनी पृ. क्र. ३५७ वरील सुधारीत अंदाजपत्रकाबाबत बोलताना सांगितले की, सदर मुळ अंदाजपत्रक ५ वर्षांनी सुधारीत केलेले प्रस्तावित केले आहे, तरी तोपर्यन्त काम चालू असते का? सद्य:स्थिती काय आहे?

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर कामास

...१०/-

सन १९९०-९१ चे दर लावले जातात का? तसेच मुळ अंदाजपत्रक १४०% ने वाढले आहे, तरी त्यांची नि.का.अ. यांनी तपासणी केली का?

यावर नि.का.अ. श्री. गद्रे यांनी खुलासा करताना सांगितले की, ठेकेदाराला जे पेमेंट केले जाते ते अँग्रीमेंटला जी एस्टीमेट जोडलेली असतात त्या एस्टीमेटच्या रेटप्रमाणे केले जाते. सदर इस्टीमेट सुधारित असल्यामुळे ठेकेदाराला पेमेंट ९०-९१ च्याच दराने मिळणार आहे.

मा. सभापती यांनी असे मत मांडले की, बजेटमध्ये मुळातच तरतुद कमी असते. म्हणून काटेकोरपणे अंदाजपत्रके बनविल्यास मंडळ अधिक कामे करु शकेल. इमारती दुरुस्त करण्याकडेच मंडळाचा कल असला पाहिजे. कारण ८८[३] जाहिर केले तर लोक संक्रमण शिबीरात जातील व पुनर्रचनेचे काम त्याच वेगाने होत नाही. तरी जरुर भासल्यास इमारतीच्या पहाणीचे वेळी मंडळाच्या सदस्यांनाही बोलाविण्यांत यावे. तसेच श्री. राव यांना त्यांनी सूचना दिल्या की, इमारतीस भेट दिल्यानंतर दोन-तीन दिवसांत त्या इमारतीचे एस्टीमेट आले पाहिजे, याची दक्षता घ्यावी.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी अशी सूचना केली की, आजच्या बैठकीत पहाणी करावयाच्या इमारतींचा अहवाल पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा.

मा. सभापती यांनी पुढील बैठकीच्या अनुपालन अहवालात आजच्या बैठकीत झालेल्या चर्चेची गांभीर्यपूर्वक नोंद घेऊन वास्तुशास्त्रज्ञांच्या बाबतीत घेण्यांत आलेले निर्णय, कमीजास्त होणा-या क्षेत्रफळाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल बनविण्यांत येईल, असे गृहीत धरुन दक्षिण परिमंडळाचे प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र. ३८/२९

दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांच्या परिशिष्ट "अ" मधिल अंदाजपत्रकांच्या प्रस्तावांना मा. सभापती यांनी दिलेल्या वरील सुचनांच्या अधिन राहून मंजूरी देण्यांत आली.

---

बाब क्रमांक :- ३८/५

विषय :- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाचे नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी प्रदान करणेबाबतचा प्रस्ताव.

उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मंजूरी देण्याचे प्रस्ताव पृ.क्र. ५४५ ते ७११ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर चर्चा करताना मा. सदस्य श्री. उलपकर यांनी पृ.क्र. ६५३ वरील प्रस्तावाबाबत संबंधित अधिका-यास माहिती देण्यास सांगितले. तद्नुसार संबंधित अधिकारी यांनी सदर प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यामागचा उद्देश सांगितला. प्रदिर्घ चर्चेअंती सदर प्रस्ताव मान्य करण्यांत आला.

मा. सदस्य श्री. सावरकर यांनी पृ.क्र. ७६३ वरील जद्दीवाला चाळी-बाबत बोलताना सांगितले की, मंडळातर्फे ही इमारत ८८(३) खाली घोषित झालेली असताना शासनाने ही इमारत दुरुस्तीसाठी घेण्यात यावी असे पत्र पाठवावयाचे कारण काय? तसेच मंडळाने विकसकास सदर मालमत्तेचा पुनर्विकास करण्यास इरादा पत्र दिले आहे का?

यावर मा. सभापती यांनी असे मत मांडले की, संपूर्ण मालमत्ता मंडळाकडे वेस्ट झालेली असताना इमारतीची दुरुस्ती करु शकतो का? तसेच उपकरातून वगळलेल्या मालमत्तेवर आपण खर्च करु शकतो का? इमारतीत काही अपघात होणार नाही याची काळजी घेण्यासाठी योग्य ती पावले उचलण्यात यावीत व सदर प्रस्ताव पुढे ढकलण्यात यावा. मधल्या काळात रहिवाशांना असे कळविण्यांत यावे की, अशी परिस्थिती असल्यामुळे इमारतीची दुरुस्ती करता येत नाही. तसेच सदर मालमत्ता मंडळाकडे वेस्ट झालेली आहे, कोर्टाचे आदेश आहेत की, इमारतीची मंडळामार्फत पुनर्रचना करण्यांत यावी व मालमत्ता उपकरातून वगळलेली आहे, असे असतानाही शासनाने अशाप्रकारचे आदेश कसे काय दिलेत? तरी ही बाब शासनाच्या नजरेस आणणे अत्यंत जरुरीचे आहे. सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते सदर प्रस्ताव मु.अ./दुवपु यांचे समवेत चर्चा करण्यासाठी राखून ठेवण्यांत आला.

मा. सदस्य श्री. गोडांबे यांनी पृ.क्र. ७७५ वरील सोनाबाई इमारतीच्या दुरुस्तीबाबत विचारलेल्या मुद्दयाबाबत मा. सभापतींनी संबंधित अधिका-यांना विचारले की, मंडळाच्या नॉर्मप्रमाणे इमारतीची दुरुस्ती का करण्यांत येऊ नये? वस्तुस्थिती अशी आहे की, मालकाच्या आडमुठेपणाच्या धोरणामुळे इमारतीच्या दुरुस्तीचे काम नीट चाललेले नाही. या प्रकारास आता ७-८ महिने होत आहेत. यावर मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी, जर मालक कामात अडथळे आणत असेल तर पोलिसात तक्रार का करण्यांत येत नाही? असे मत मांडले. सदस्य श्री. दगडू सकपाळ यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मंडळाचे अधिकारी

पोलिसात तक्रार करावयास गेले असता त्या तक्रारींकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. यावर मा. सभापती यांनी ही बाब संबंधित अधिका-यांनी वरिष्ठांच्या लक्षात आणून द्यावयास पाहिजे असे मत मांडले. या प्रकरणाची नोंद श्री. भुवनदास यांनी घेऊन मा. सदस्य श्री. गोडांबे यांचेशी चर्चा करावी असे सुचविले.

सविस्तर प्रदीर्घ चर्चेअंती वर ठरल्याप्रमाणे उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्र. ३८/ २९२

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामांच्या परिशिष्ट "ब" मधिल सर्व अंदाजपत्रकांच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

बाब क्रमांक :- ३८/६.

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यांत येणारे विषय.
-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालील पुनर्रचना विभागांचा नामकरणाचा एक प्रस्ताव व दक्षिण व उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याचे प्रस्ताव सादर केले आहेत.

पुनर्रचना विभाग.

[१] इ. क्र. १२२-१३०-११४ "डी" आणि "ई" तोबाबाची चाळ, डॉ. आंबेडकर रोड, "ई" विभाग, येथील पुनर्रचित इमारतीच्या नावाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाची अंदाजपत्रके.

[२] इ. क्र. २०१, बाकडी चाळ, वरळ व्हिलेज.

[३] इ. क्र. २०२, बाकडी चाळ, वरळ व्हिलेज.

[४] इ. क्र. ११, कामाठीपुरा, १५वी गल्ली.

दक्षिण परिमंडळातील दुरुस्ती कामाची अंदाजपत्रके.

[५] इ. क्र. ९८-१००, व्ही. व्ही. चंदन स्ट्रीट [रामकृष्ण बिल्डींग].

[६] इ. क्र. २१-२३ महादेव शंकरशेठ, मुंबई.

उपरोक्त प्रस्तावांची माहिती देताना मा. सभापती यांनी सांगितले की, "ई" विभागातील तोबाबाची चाळीच्या भाडेकरू/रहिवाशांनी त्यांच्या चाळीस "इंद्रप्रस्थ" हे नांव देण्यास संमती दर्शविली आहे तरी सदर नांव देण्यास मंडळाची हरकत नाही. सविस्तर चर्चेअंती नवीन पुनर्रचित होणाऱ्या इमारतीस "इंद्रप्रस्थ" हे नांव देण्याचे ठरले.

उत्तर परिमंडळातील दुरूस्ती कामाची तीन अंदाजपत्रके मंजूरी देण्यासाठी सादर करण्यांत आलेली आहेत. सदर बाबत चर्चा करताना मा. सभापती यांनी सांगितले की, सदर अंदाजपत्रके सन्मा. सदस्यांच्या विनंतीनुसार ठेवण्यांत आली आहेत, कारण सदर इमारतींना दुरूस्तीची तातडीची गरज आहे. वरील इ. क्र. ११, कामाठीपुरा, १५वी गल्ली येथील सांडपाण्याचा काही भाग कोसळलेला असल्याने त्याची तातडीने दुरूस्ती करणे गरजेचे आहे.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील वरील तिनही प्रस्तावांना सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

दक्षिण परिमंडळातील दुरूस्ती कामाची दोन अंदाजपत्रके मंजूरी देण्यासाठी सादर करण्यांत आलेली आहेत. सदर प्रस्तावावर चर्चा करताना सन्मा. सदस्यानी उपस्थित केलेल्या मुद्दयास अनुसरून मा. सभापती यांनी सदर इमारतींना सन्मा. सदस्य भेट देतील या अटीस अधिन राहून त्यास मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ३८/ २९३

[१] इ. क्र. १२२-१३०-११४ "डी" आणि "ई" तोबाबाची चाळ, डॉ. आंबेडकर रोड, "ई" विभाग, येथील पुनर्रचित इमारतीस "इंद्रप्रस्थ" हे नांव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

उत्तर परिमंडळातील दुरूस्ती कामाची अंदाजपत्रके.

[२] इ. क्र. २०१, वाकडी चाळ, परळ व्हिलेज.
[३] इ. क्र. २०२, वाकडी चाळ, परळ व्हिलेज.
[४] इ. क्र. ११, कामाठीपुरा, १५ वी गल्ली.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील वरील तीनही प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

दक्षिण परिमंडळातील दुरूस्ती कामाची अंदाजपत्रके.

[५] इ. क्र. ९८-१००, व्ही. व्ही. चंदन स्ट्रीट [रामकृष्ण बिल्डींग]
[६] इ. क्र. २१-२३ महादेव शंकरशेठ, मुंबई.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयास अनुसरून मा. सभापती यांनी सदर इमारतींना सन्मा. सदस्य भेट देतील या अटीस अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

---

विषय- इ.कृ.३७/१० रंगवाला बिल्डिंग या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या गणेश गल्ली, लालबाग, मुंबई-४०००१२ येथील भूखंड व त्यावरील इमारतींसह नियोजित अमृतवेल सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

---

उपरोक्त प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने व मा. सदस्य श्री दगडू सकपाळ यांच्या विनंतीनुसार सर्व सन्माननीय सदस्यांच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक :३८/ २९४

इ.कृ. ३७/१० रंगवाला बिल्डिंग या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या गणेश गल्ली, लालबाग, मुंबई-४०००१२ येथील भूखंड व त्यावरील इमारतींसह नियोजित अमृतवेल सहकारी गृहनिर्माण संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

.......

विषय- मुंबई बेटावरील "अ" वर्गातील जुन्या उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासाठी नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याचा प्रस्ताव.

---

उपरोक्त विषयाच्या संदर्भात मा. अध्यक्षांच्या परवानगीने "अ" वर्गातील जुन्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी घर मालक, विकसक, भाडेकरू यांनी सादर केलेल्या खालील ८ प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव बैठकीसमोर ठेवण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांवर प्रदीर्घ चर्चा होऊन सर्वानुमते सदर प्रस्तावांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे ठरले.

१] भूकर पहाणी कृ. ४७७/१०, माटुंगा विभाग, भूखंड कृ. ७३, दादर-माटुंगा इस्टेट, इ.कृ. २७, भाऊ दाजी मार्ग, उपकर कृं. फ-७९७३ [६] माटुंगा, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता " ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत. [फाईल कृ. ७८८].

२] अंतिम भूखंड कृ. ४६९, नगररचना योजना कृ. ४[चार] माहीम विभाग, उपकर कृ. ३३२१[१बी], ३३२१[२], ३३३१[३], ३३२१[२ए], ३३२१[२एए] ३३३१[१] व ३३३१[२] चितळे पथ, दादर [प.]

येथील कवळीवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करणेबाबत. [फाईल क्र. २५० ].

३] भूकर पहाणी क्र. १/६३९, गिरगांव विभाग, इ. क्र. १३४-एच, व्ही. पी. रोड, उपकर क्र. डी. १५९८[१], गिरगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत [फाईलक्र. ८५२ ].

४] भूकर पहाणी क्र. ३८७४, भुलेश्वर विभाग, २५-सी, चंदनवाडी, सी. पी. टँक मार्ग, "सी" विभाग, मुंबई येथील प्लॉट "अ" च्या पुनर्विकासाकरिता "नाहरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. [फाईल क्र. ७०१]

५] भूकर पहाणी क्र. १६०९, भायखळा विभाग, इ. क्र. २८, क्लब बॅक रोड व ३५ सीटर स्ट्रीट, उपकर क्र. ई-४१०७ [१] मराठा मंदिर मार्ग, मुंबई येथील "नारायण निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकतप्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. [फाईल क्र. ८१५].

६] अंतिम भूखंड क्र. १५८, नगररचना योजना क्र. ३ माहीम विभाग इ. क्र. १४, १४बी, १४एफ, १४ए, १४डी आणि १४सी, कुलन मिल लेन, मनमाला टँक रोड, दादर[प. ] मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत [फाईल क्र. ७४५]

७] भूकर पहाणी क्र. ११८६, मांडवी विभाग, इ. क्र. ७९, मेमनवाडा मार्ग, बी. विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. [फाईल क्र. ५८०]

८] भूकर पहाणी क्र. ६९५, १/६९६ व ६९७, माहिम विभाग, ग/उत्तर विभाग, शितलादेवी टेंपल मार्ग, माहिम, कापडबाजार मुंबई- "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासाकरता " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत[फाईल क्र. ६९०]

ठराव क्रमांक : ३८/ २९५
====================

" अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रस्तावित केलेल्या खालील ८ प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे सर्वानुमते ठरले.

१. भूकर पहाणी क्र. ४७७/१०, माटुंगा विभाग, भूखंड क्र. ७३, दादर-माटुंगा इस्टेट, इ. क्र. २७, भाऊ दाजी मार्ग, उपकर क्र. फ-७९७३[६] माटुंगा, मुंबई ययेथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत. [फाईल क्र. ७८८].

२. अंतिम भूखड क्र. ४६९, नगररचना योजना क्र. ४[चार], माहिम विभाग, उपकर क्र. ३३२१ [१बी], ३३२१[२], ३३२१[३] ३३२१[२ए], ३३२१[२एए], ३३९१[१] व ३३३१[२] चितळे पथ, दादर[प. ] येथील कवळीवाडी म्हणून ओळखल्या

जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

३. भूकर पहाणी क्र. १/६३९, गिरगांव विभाग, इ. क्र. १३४"एच, व्ही. पी. रोड, उपकर क्र. डी. १५९८ [१], गिरगांव, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

४. भूकर पहाणी क्र. ३८७४, भुलेश्वर विभाग, २५-सी, चंदनवाडी, सी. पी. टँक मार्ग, "सी" विभाग, मुंबई येथील प्लॉट "अ" च्या पुनर्विकाकरिता " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

५. भूकर पहाणी क्र. १६०९, भायखळा विभाग, इ. क्र. २८, क्लब बॅक रोड व ३५ सॉटर स्ट्रीट, उपकर क्र. ई-४१०७[१] मराठा मंदिर मार्ग, मुंबई येथील "नारायण निवास" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

६. अंतिम भूखंड क्र. १५८, नगररचना योजना क्र. ३, माहिम विभाग इ. क्र. १४, १४बी, १४एफ, १४ए, १४डी आणि १४सी, वुलन मिल लेन, मनमाला टँक रोड, दादर[प.] मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

७. भूकर पहाणी क्र. ११८६, मांडवी विभाग, इ. क्र. ७९, मेमनवाडा मार्ग, बी. विभाग, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

८. भूकर पहाणी क्र. ६१५, १/६१६ व ६१७, माहिम विभाग व/उत्तर विभाग, सितलादेवी टेंपल मार्ग, माहिम, कापडबाजार, मुंबई. "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासाकरिता "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

......

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य, भालचंद्र ठाकूर व मा. सदस्य श्री उसपकर यांनी मागील दोन बैठकीमध्ये गिरगांव येथील कामत चाळीच्या पुनर्विकासाच्या कामास ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या मांडलेल्या प्रस्तावास अनुसरून मा. सभापती यांनी सांगितले की, सदर चाळीचा पुनर्विकास शासनाने ठरलेल्या २.०० चटईक्षेत्र निर्देशांकानुसार भाडेकरू करणार आहेत. आपल्या सन्माननीय सदस्यांनी सदर इमारतीस भेट देऊन त्याबाबतचा अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार व त्यांनी प्रत्यक्ष जागेवर लोकांसमवेत केलेल्या पहाणी व चर्चेनुसार सदर मालमत्तेस ना हरकत प्रमाणपत्र देण्यास हरकत नाही असे मत प्रदर्शित केले. सविस्तर चर्चेअंती गिरगांव येथील कामत चाळीच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे सर्वानुमते ठरले.

......१७

भूकर पहाणी क्र.२१४६, भुलेश्वर विभाग, इ.क्र.३१८-३२० अबी, ३२०-३१८-अ ३१८ अेअे, ३१८सी, ३१८-३१८एस, जगन्नाथ शंकर शेठ मार्ग, ठाकूरद्वार, कामत चाळ या नांवाने ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

चर्चेच्या ओघाओघात मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, गाळा हस्तांतरणाचे [टी.ओ.टी.] प्रस्तावाबाबत पुष्कळ तक्रारी येतात व त्यासंबंधी सन्मा. सदस्य श्री दगडू सकपाळ व इतर यांनी सदर प्रस्ताव मंजूर करावा असे पत्र दिले होते. सन १९९३ मध्ये नियमितीकरणाच्या योजने अंतर्गत मंडळाला ५ कोटी १२ लाख रुपये प्राप्त झाले, १९९४ मध्ये या योजनेपोटी मंडळालासुमारे ३ कोटी रुपये प्राप्त झाले. सदर प्रस्ताव प्राधिकरणापुढे ठेवण्यात आला होता. तेव्हा मा.अध्यक्ष/प्राधिकरण व प्राधिकरणाचे सदस्य यांनी हा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. या प्रस्तावानुसार यापुढे २०० चौ.फू.साठी २०,०००/-रुपये, २०१ ते २५० चौ.फू.पर्यंत रु. २५,०००/- व २५१ चौ.फू.पुढे रु.३०,०००/- घेण्यात येतील तर अनिवासी गाळयांसाठी २०० चौ.फू.पर्यंत रु.४०,०००/-, २०१ ते २५० चौ.फू.पर्यंत रु.५०,०००/- व २५१ चौ.फू.पेक्षा जास्त अनिवासी गाळयासाठी रु.६०,०००/- घेण्यात येणार आहेत. मा.सभापती यांनी पुढे असा खुलासा केला की, जे २० टक्के कोटयातील गाळे दिलेले आहेत किंवा जे वादास्पद गाळे आहेत ते नांवावर होणार नाही तसेच ज्या गाळयांत घुसखोर आहेत तेही तूर्त नांवावर होणार नाहीत. परंतु मुळ भाडेकरूकडून जर कोणी गाळा घेतला असेल तर गाळे नांवावर होतील.

मा.सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मागील बैठकीत कुटुंबातील रक्ताचे नाते असलेल्या इसमाच्या नावे गाळा करताना मुळ भाडेकरू हयात असेल तर रु.१५,७५०/- मंडळ घेते परंतु मुळ भाडेकरू जर हयात नसेल तर मात्र रु.१०००/- घेण्यात येतात व त्याप्रमाणे पैसे भरण्यास लोकांना पत्रे पाठवून कळविण्यात आले आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी योग्य तो खुलासा केला. त्यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई मंडळामध्ये सुध्दा हस्तांतर पध्दत अशीच आहे. परंतु त्याने मा. ~~सभापतींच्या~~ सदस्यांचे समाधान झाले नाही.

मा.सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, मुळ भाडेकरू जिवंत असताना रुपये १५७५०/- व त्यांच्या मृत्युनंतर मात्र रु.१०००/- नांवावर करण्यासाठी घेण्यात येतात ही बाब विचित्र आहे.

मा.सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत मांडले की, रक्ताचे नाते असेल त्यांचेकडून रु.१०००/- द्यावयाचे ठरलेले आहे. त्यामुळे मुळ भाडेकरूच्या हयातीत आणि हयातीनंतर वेगवेगळया रक्कम घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

यावर मुख्य अधिकारी यांनी याबाबत कायदेशीर स्पष्ट अशी व्याख्या करावी लागेल असे मत मांडले. यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी कुटुंबाची व्याख्या करताना काय केले जाते असा प्रश्न विचारला. तेव्हा मा. सभापती यांनी हिंदू कोडप्रमाणे कुटुंब म्हणजे पती, पत्नी, त्यांची मुले, सून होते. तर पुतण्या, चुलता, वगैरे नाती कुटुंबात मोडत नसल्याचे सांगितले. मा. सभापती यांनी मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सख्ख्या भावाच्या नांवावर रक्ताच्या नात्याप्रमाणे जागा होऊ शकत नाही असे सांगितले. मा. सदस्य श्री सकपाळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी रक्ताच्या नात्यात कोण कोण येतात याबाबतचे परिपत्रक समजावून द्यावे असे मत मांडले. सविस्तर चर्चेअंती मा. सभापती यांनी या प्रश्नाबाबत प्राधिकरण स्तरावर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. व टी. ओ. टी. प्रकरणांच्या अंमलबजावणीबाबतचे एक परिपत्रक काढण्यात यावे अशी अधिकाऱ्यांना सूचना केली.

मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी जरीवाला चाळीच्या दुरुस्ती बाबतच्या प्रस्तावावर मुख्य अधिकारी/दु. व. पु. यांचे मत द्यावे अशी मागणी केली. यावर मा. सभापती यांनी याबाबत सदर इमारतीची पुनर्बांधणी मंडळाने करावी असे आदेश दिलेले आहेत व सध्या सदर मालमत्ता मंडळाच्या ताब्यात आहे. शिवाय तिला उपकर लागू नाही व शासनाने तिची दुरुस्ती करावी असे आदेश दिले आहेत हे कितपत योग्य आहे अशी विचारणा केली. यावर मुख्य अधिकारी यांनी सदर बाबत माहिती देताना सांगितले की. एकदा अेन. ओ. सी. ची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर सर्व जबाबदारी अेन. ओ. सी. होल्डरची असते. पुनर्विकासासाठी सहा महिने लागणार असतील व इमारतीचा कोणताही भाग धोकादायक झाला असेल तर निश्चितपणे त्या इमारतीची दुरुस्ती करता येते. परंतु ती जबाबदारी अेन. ओ. सी. होल्डरनी घेतली पाहिजे किंवा मंडळामार्फत दुरुस्ती करावयाची असेल तर अेन. ओ. सी. होल्डर्सनी मंडळास लेखी हमी दिली पाहिजे.

यावर मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी अशाप्रकारचे पत्र एन. ओ. सी. होल्डरस देऊन मंडळातर्फे दुरुस्ती करण्यात आल्यानंतर दुरुस्तीचा जो खर्च येईल तो अेन. ओ. सी. होल्डरकडून द्यावा लागेल अशी स्पष्ट जाणीव करुन देण्यात यावी. यावर मुख्य अधिकारी यांनी संबंधित अधिकारी श्री भुवनदास याना त्याप्रमाणे पत्र पाठविण्याच्या सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी त्यांना मा. आमदार श्री बाळा नांदगावकर यांचे पत्र आले असून पत्रात असे कळविले आहे की, तोबावाणी चाळीची पुनर्बांधणी योजना पंतप्रधान अनुदान प्रकल्पा अंतर्गत राबविली जाणार होती. त्याप्रमाणे पं. प्र. अ. प्रकल्पातर्फे काही इमारतीही बांधण्यात आल्या. परंतु सदर जागेचा मालक

कोर्टात गेल्यामुळे पं. अ. प्रकल्पाने ही योजना सोडून दिली व मुं. इ. दु. व. पु. मंडळाकडे दिली. आता मंडळाकडून इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. आहे की ते रहिवाशी कोर्टात पार्टी झाले म्हणून मंडळाने ती केस जिंकली. आता चाळीची पुनर्रचना झाल्यानंतर रहिवाशांनी मागणी केली आहे की, त्यांनी कोर्टात पार्टी होऊन मंडळास मदतच केली आहे. म्हणून मंडळाने ही इमारत पुन्हा पं. अ. प्रकल्पाकडे द्यावी. मंडळाने आपला पैसा घ्यावा व पं. अ. प्रकल्पाने रहिवाशांना जादा गाळ्याचे वाटप करावे. यावर सदस्य श्री सकपाळ यांनी विचारणा केली की, मंडळातर्फे इमारत बांधण्यात आलेली असल्यामुळे ती पंतप्रधान अनुदान प्रकल्पाकडे हस्तांतरण करू शकतो का ?

यावर मुख्य अधिकारी/दुवपु यांनी पंत प्रधान अनुदान प्रकल्पामागची पार्श्वभूमि सर्वांना विदित केली. त्यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, एकदा मालमत्ता मंडळाच्या ताब्यात येऊन मंडळाने त्याचा विकास केला तर त्या मालमत्तेस मंडळाचे नियम लागू होतात. यावर मा. सभापती यांनी असे मत मांडले की, रहिवाशी मंडळाने इमारत बांधून द्यावी म्हणून कोर्टात गेले होते. दोन दोन गाळे मिळावेत म्हणून कोर्टात गेले नव्हते. जर ही इमारत पं. प्र. अनुदान प्रकल्पाकडे दिली तर इतर पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त गाळ्यांबाबत रहिवाशी येऊन सांगतील की, आम्ही पैसे द्यावयास तयार आहोत, आम्हालाही एक जादा खोली देण्यात यावी. त्यामुळे मंडळाचा उद्देश सफल होणार नाही.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी २११-बी, आगबोट चाळीबाबत मा. आमदार श्री बाबा आंदगांवकर यांचे त्यांना एक पत्र मिळाले असून त्या इमारतीतील ३० रहिवाशी विक्रोळी येथे रहात असून त्यातील २५ रहिवाशी या मुळ इमारतीत यावयास तयार नाही. त्यामुळे इमारतीचे वितरण होत नाही तरी आणखी किती काळ वितरणासाठी थांबावयाचे अशी विचारणा केली. यावर मा. सभापती यांनी असे सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत संक्रमण शिबीरातील गाळ्यांत या २५ रहिवाशांना कायमचे रहात येणार नाही. शासनाने त्यांच्याबाबत निर्णय घेतला आहे की, वारंवार विनंती करूनही ते जर मुळ इमारतीत रहावयास येत नसतील तर त्यांच्या अपरोक्ष समक्ष अधिकाऱ्यांच्या साक्षीने पुनर्रचित इमारतीतील गाळ्याचे वाटप करण्यात येईल. पुढे मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळाने संक्रमण शिबीरातील खोल्या खाली करण्याबाबत नोटीसा पाठविल्या आणि त्यातील एक जरी रहिवाशी कोर्टात गेला तर कोर्टाचा अवमान होण्याची भिती आहे. यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, जेव्हा चाळीतील लोक चाळीच्या बाहेर होते आणि बाहेरच्या लोकांना जेव्हा सदर चाळीत जागा दिल्या तेव्हा कोर्टाचा अवमान

झाला नाही का? संक्रमण शिबीरात २५ भाडेकरूंना शासन ठेवावयास तयार नाही हे माहीत असूनही ते रहिवाशी जर मुळ पुनर्रचित इमारतीत येत नसतील तर इतर लोकांनी वितरणासाठी अजून किती रखडावयाचे ? यावर मा. सभापती यांनी त्या रहिवाशांच्या इच्छेचा प्रश्न नसून कायद्याचा प्रश्न असल्याचे मत मांडले व पुढे सांगितले की, जरी ते रहिवाशी येत नसतील तरी त्यांची सोडत काढावयाची व सोडतीप्रमाणे जागा देण्यात यावी व संक्रमण शिबीरातील खोल्या खाली केल्या नाहीत तर पोलीस कारवाई करून जागा मंडळाच्या ताब्यात घेण्यात येतील असे त्यांना पत्र पाठवावयाचे.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत मांडले की, भाडेकरूंचे गाळे वाटपाबाबत जर एकमत होत नसेल तरच सोडत काढली पाहिजे. परंतु जर रहिवाशी एकमताने गाळे वाटप करून घेत असतील तर सोडत काढण्याचा प्रश्न येत नाही. यावर मा. सभापती यांनी कायदा, भावना आणि वस्तुस्थिती यांचा विचार करून मुख्य अधिकारी यांनी लवकरात लवकर याबाबत निर्णय घ्यावा अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी वाणी चाळीचा प्रश्न उपस्थित केला असता मा. सभापती यांनी माहिती दिली की, वाणी चाळीत मंडळाकडे ७८ गाळे अतिरिक्त गाळे उपलब्ध होत असून प्लॅन मंजूर करताना महानगरपालिकेने एक अट घातली होती की, जे जादा गाळे होतील त्यातील ५० टक्के गाळे महानगरपालिकेला देण्यात यावेत. आता ताबा द्यावयाची वेळ आली त्यावेळी महानगरपालिका पाणीपुरवठा द्यावयास एका अटीवर तयार आहे ती म्हणजे महानगरपालिकेस ३४ गाळे देण्यात यावेत. परंतु मंडळाने महानगरपालिकेस सांगितले आहे की, या ३४ गाळ्यांवर महानगरपालिकेचा काहीही अधिकार नाही. मंडळाने महानगरपालिकेची वरील अट मंजूर केल्यानंतर उच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे की, ज्या रिपेअर सेसच्या इमारती बांधल्या जातील त्यांचा उपयोग रिपेअर सेस इमारतीतील भाडेकरूंसाठीच केला पाहिजे. या विषयाबाबत मा. महापौर, मुंबई यांनी सोमवारी एक बैठक बोलाविली असून त्या बैठकीत अंतिम निर्णय होणार आहे. जर कायद्याप्रमाणे महानगरपालिकेला ३४ गाळे द्यावे लागले तर देऊ व इमारतीचे वितरण करू.

मा. सदस्य श्री अरविंद रेळे यांनी यापूर्वीचे सरकार असताना विभागीय पातळीवर मा. आमदार, मा. नगरसेवक, मंडळाचे सदस्य, स्थानिक अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी यांची वॉर्ड ऑफिसमध्ये बैठका होत असत. त्याप्रमाणे आपल्या सरकारच्या काळात अशा बैठका घेतल्या जात नाहीत त्याचे कारण काय? यावर मा. सभापती यांनी त्याप्रमाणे पुन्हा बैठका घेण्याबाबत महानगरपालिकेत त्यांच्या स्तरावर

विनंती करण्यात येईल.

मा. सदस्य श्री दगडू सकपाळ यांनी माहिती दिली की, मंडळाच्या परमानंदवाडी या पुनर्रचित इमारतीत रोज रात्री तीन सोडतीनच्या सुमारास गाळ्यात घुसखोरी होते. त्या इमारतीच्या भाडेवसुलीकाराने आतापर्यंत किती लोकांच्या तक्रारी पोलीसात दाखल केल्या आहेत ? असे विचारून तेथे कोणी शशिकांत सावंत नांवाचा दलाल असल्याचे सांगितले.

यावर मा. सभापती यानी अशी माहिती दिली की, मा. मुख्य अधिकारी यांनी श्री त्यागी साहेब यांना पत्र लिहून मंडळास मदत करावी अशी विनंती केली आहे व घुसखोरांची, दलालांची नावे दिल्यास त्यांना कायद्याच्या कोठल्याना कोठल्या कलमाखाली अडकविता येईल. तसेच सदर बाबत पानसरे नांवाच्या मुख्य भाडेवसुलीकाराने पोलीसात तक्रारही दाखल केली आहे.

मा. सदस्य श्री गोडांबे यांनी सुरक्षा रक्षकांचा प्रश्न उपस्थित केला असता मा. सभापती यांनी माहिती दिली की, सुरक्षा रक्षक काहीही काम करत नाहीत. ओशिवरा येथे त्यांनी भेट दिली असता त्यांना असे दिसून आले की, रिकाम्या गाळयांची यादी आपल्या भाडेवसुलीकाराकडे नव्हती तर ती सुरक्षा रक्षाकाकडे होती. ते सुरक्षा रक्षक दलालांना गाळे देतात. चार सुरक्षा रक्षक कामावर हजर दाखविलेले असताना प्रत्यक्ष दोन सुरक्षा रक्षक कामावर हजर असतात. कधी कधी ७-८ सुरक्षा रक्षकांपैकी फक्त एकच सुरक्षा रक्षक कामावर हजर असतो. गैर हजर असलेले सुरक्षा रक्षक दुसऱ्या दिवशी येऊन ७-८ दिवसांच्या सहया करतात. हया बाबी सुरक्षा रक्षकांच्या दक्षता शाखेने तपासणी केल्यानंतर लक्षात आल्या आहेत. त्यामुळे असा प्रस्ताव मांडण्यात येत आहे की, सुरक्षा रक्षक ठेवण्याची ही पध्दत बंद करुन महानगरपालिकेच्या स्तरावर जशी यंत्रणा असते त्याप्रमाणे एखादी मंडळा अंतर्गत यंत्रणा उभी करुन मंडळाचे त्यावर नियंत्रण राहील. सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या दि. २०. ७. ९६ रोजी होणाऱ्या बैठकीत ठेवण्यात येणार आहे. सुरक्षा रक्षकांची पगाराची बीले काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

मा. सदस्य श्री साटम यांनी छेडा बिल्डिंग, ८६-१०६, या इमारतीच्या पुनर्बांधणी संबंधीच्या कागदपत्रांची पूर्तता करुन भूसंपादनासाठी प्रस्ताव मंत्रालयात गेलेला आहे. त्यास अनेक महिने होऊन गेले तरी अजूनही त्याबाबत काही कार्यवाही झालेली नाही असे सांगितले. यावर मा. सभापती यांनी त्यांना त्या चाळीच्या संबंधित पदाधिकाऱ्यांना भेटावयास सांगावे असे सांगितले.

मा. सदस्य श्री प्रकाश भुवड यांनी कुलाबा संक्रमण शिबीरात तीन

इंचाची अतिरिक्त लाईन टाकण्यात आली आहे परंतु पाण्याला जोर नाही, याचे कारण संक्रमण शिबीराच्या आजूबाजूला जी झोपडपट्टी झालेली आहे, तेथे बूस्टर पंप लावण्यात आलेले आहेत. त्यामुळे पाण्याचा प्रेशर तेथे खेचला जातो या प्रश्नाबाबत महानगरपालिकेवर रहिवाशांचा मोर्चाही नेला होता. तेव्हा सभागृह नेत्यांबरोबर चर्चा केल्यानंतर ते या प्रश्नात लक्ष घालणार होते. त्यांनी पुढे असे सुचविले की, बूस्टर पंप लावल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. परंतु महानगरपालिका बूस्टर पंप लावण्यासाठी परवानगी देऊ शकत नाहीत असे मंडळाच्या अधिका-यांना सांगण्यात आले आहे. यावर मा. सभापती यांनी संबंधित अधिका-यांना बुस्टर पंप लाऊन मिळण्यासाठी विशेष परवानगी मिळण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, तसेच मा. सदस्यांनी रहिवाशांना पाणी-पुरवठ्याच्या प्रश्नासंबंधी मंडळाचा काही संबंध नाही याची जाणीव करुन द्यावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री प्रकाश भूवड यांनी विशेष भूसंपादन अधिका-याचे कार्यालय जे कलेक्टरच्या कार्यालयात आहे तेथे टायपिंग मशिन्स, सायक्लोस्टायलिंग मशीन वगैरे नाही असे सांगून सदर शाखा गृहनिर्माण भवनात हलविण्यात यावी अशी मागणी केली. तर मा. सभापती यांनी विशेष भूसंपादन अधिकारी ह्यांना कलेक्टर वेगळीच कामे देत असतात असे सांगून महसूल खात्याचे सेक्रेटरी श्री बहादूर यांनी त्यांना लेखी तक्रार करावयास सांगितले आहे. विशेष भूसंपादन अधिकारी यांचे कार्यालय गृहनिर्माण भवन, वांद्रे येथे येईपर्यंत म्हाडाच्या कामाशिवाय इतर दुसरे कोणतेही काम त्यांनी करु नये अशा सूचना देण्यात याव्यात असे मा. सभापती यांनी श्री बहादूर यांना सांगितले आहे. तसेच सदर कार्यालयात ज्या त्रुटी असल्याचे मा. सदस्यांनी निदर्शनास आणून दिलेल आहे त्याबाबत त्यांना लेखी पत्र लिहिण्यात येऊन सदर बाब त्यांच्या लक्षात आणून देण्यात यावी अशा सूचना दिल्या.

मा. सदस्य श्री भूवड यांनी पूर्वी पेटी कॉंट्रॅक्टस होती ती सध्या अस्तित्वात नाहीत. संक्रमण शिबीर किंवा पुनर्रचित इमारतीमधून ५-७ हजार रुपयांपर्यंत दुरुस्ती व देखभालीची छोटी छोटी कामे करण्यासाठी पेटी कॉंट्रॅक्टर्स नेमण्यात यावेत अशी सूचना केली. मा. सभापती यांनी सदर बाब धोरणात्मक असल्याने छोट्या छोट्या ५-१० हजारपर्यंतच्या कामासाठी कार्यकारी अभियंता यांच्या पातळीवर खर्च करण्यास मंजूरी मिळण्यास हरकत नाही असे वाटते असे मत मांडले.

मा. सदस्य श्री भूवड यांनी संक्रमण शिबीरातील गाळ्यांची वितरणे मिळण्याकरिता रहिवाशांना ३-४ महिने लागतात. त्यांच्याकडे एका ८० वर्षांच्या म्हातारीचे प्रकरण असून सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेली असूनही

तिला कार्यालयात घेतलेसुद्धा जात नाही. तिची मूळ इमारत अतिशय धोकादायक झालेली आहे. यावर मा. सभापती यांनी संक्रमण शिबीर कार्यालयाबद्दल फारच तक्रारी असल्याचे सांगून मुख्य अधिकारी यांनी गंभीर नोंद घ्यावी असे सुचविले.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी अशी विचारणा केली की, जुनी चिखलवाडी या इमारतीची योजना लवकर पूर्ण व्हावी यासाठी महानगरपालिकेचे डायरेक्टर श्री अशोक काळे यांच्याकडे म्हाडाच्या अधिकाऱ्यांची एक बैठक बोलाविली आहे. परंतु मेजरमेंटसाठी भरावयाचे पैसे कॅशने भरावयाचे की, चेकने भरावयाचे याबाबत घोळ घालण्यात येऊन विनाकारण वेळ लावला जात आहे. तरी याबाबत संबंधित अधिकारी खुलासा करतील काय? यावर मा. सभापती यांनी शासनाच्या एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात चेकनेच पैसे दिले जातात जर कॅशने पैसे भरावयास सांगण्यात येत असेल तर ते चुकीचे आहे, असे सांगून मुख्य अधिकारी यांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांचा प्रश्न महत्त्वाचा असून तो सोडविण्यात यावा.

